## महाभारतातील अलौकिक चरित्रे : खंड १

# निष्काम कर्मयोगी भीष्म

## (महाभारतातील मौलिक शिकवणही अंतर्भूत !)

मराठी (Marathi)


**लेखक**


**श्री. दुर्गेश जयवंत परुळकर**



## सनातन संस्था


एप्रिल २०२३ पर्यंत सनातनच्या ३६० ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९३ लाख ३९ सहस्र प्रती !

# लेखक श्री. दुर्गेश परुळकर यांचा परिचय



**१. पूर्ण नाव आणि पत्ता :** श्री. दुर्गेश जयवंत परुळकर, 'बी २०१', श्री शिव-समर्थ बिल्डिंग, आजदे पाडा, आजदे गाव, माऊली बंगल्याजवळ, कल्याण रस्ता, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३

**२. जन्मदिनांक :** २१.७.१९५७ (आषाढ वद्य अष्टमी, शके १८७९)

**३. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांतील कार्य**

अ. वर्ष १९७७ ते २००६ या कालखंडात '५ वी ते १२ वी'च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग चालवले. वनवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शिबिरांत मार्गदर्शन केले.

आ. 'टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली' या संस्थेचे भूतपूर्व (माजी) कार्यवाह

**४. व्याख्याने :** मुंबई, पुणे, गोवा, संभाजीनगर, सांगली, भावनगर (हैदराबाद), अंदमान अशा विविध ठिकाणी विविध विषयांवर २,५०० पेक्षा अधिक व्याख्याने

**५. नियतकालिकांतून लेखन :** 'प्रज्वलंत', 'स्वातंत्र्यवीर', 'धर्मभास्कर' अशा नियतकालिकांतून लेखन. 'दैनिक सनातन प्रभात', 'मुंबई तरुण भारत', 'बेळगाव तरुण भारत', 'नवशक्ती' आणि 'नवाकाळ' या वृत्तपत्रांमधून स्तंभलेखन.

**६. ग्रंथसंपदा**

**अ. डॉ. सच्चिदानंद शेवडे यांच्या समवेत लिहिलेले ४ ग्रंथ :** 'शिवरायांची युद्धनीती', 'पानिपतचा रणसंग्राम', 'गोवा मुक्तीसंग्राम' आणि 'ज्ञात-अज्ञात सावरकर'.

**आ. स्वतंत्रपणे लिहिलेले ११ ग्रंथ :** 'सावरकरांची राजनीती', 'क्रांतिवेदीवरील समिधा', 'क्रांतिकारक बाबाराव सावरकर', 'सावरकरांचा मार्सेलीस पराक्रम',

‘कश्मीर – उत्कर्ष आणि संघर्ष’, ‘तेजस्वी जीवन’, ‘छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा गांधी’, ‘धगधगत्या समिधा’, ‘१९६५ चा विजय’, ‘धर्मनिष्ठ सावरकर’ आणि ‘भगवद्‌गीता पद्यानुवाद’.

७. **राष्ट्रीय कार्यातील सहभाग**

अ. ‘स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर, मुंबई’ याचे भूतपूर्व कार्यकारीणी सदस्य


आ. डोंबिवली, तसेच मुंबई येथील ‘स्वा. सावरकर अभ्यास मंडळ’ यांचे भूतपूर्व कार्यवाह

इ. ‘हिंदु जनजागृती समिती’च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अनेक आंदोलनांत सहभाग

८. **आध्यात्मिक विशेषता :** श्री. दुर्गेश परुळकर यांनी ६१ टक्के आध्यात्मिक पातळी (टीप) गाठली असल्याचे १७.६.२०२२ या दिवशी गोवा येथे झालेल्या ‘दशम् अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशना’त हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्‌गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे यांनी घोषित केले. ६० टक्के आणि त्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी गाठलेल्या व्यक्तीला मृत्यूनंतर पुनर्जन्म नसतो. अशी व्यक्ती पुढील साधनेसाठी किंवा मानवजातीच्या कल्याणासाठी स्वेच्छेने पृथ्वीवर जन्म घेऊ शकते.

टीप – आध्यात्मिक पातळी : प्रत्येक व्यक्तीमध्ये सत्त्व, रज आणि तम हे त्रिगुण असतात. व्यक्तीने साधना, म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न चालू केल्यावर तिच्यामधील रज-तम गुणांचे प्रमाण अल्प होते आणि सत्त्वगुणाचे प्रमाण वाढू लागते. व्यक्तीमधील सत्त्वगुणाच्या प्रमाणावर तिची आध्यात्मिक पातळी (स्तर) अवलंबून असते. सत्त्वगुणाचे प्रमाण जितके जास्त, तितकी आध्यात्मिक पातळी जास्त असते. ‘सर्वसाधारण व्यक्तीची आध्यात्मिक पातळी २० टक्के असते, तर मोक्षाला गेलेल्या व्यक्तीची आध्यात्मिक पातळी १०० टक्के असते’, असे गृहित धरून पातळी टक्क्यांमध्ये सांगितली आहे.

# हिंदुत्वनिष्ठ लेखक श्री. दुर्गेश परुळकर यांना सनातनविषयी वाटणारा विश्वास !



सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले

‘जून २०२२ मध्ये डोंबिवली (जिल्हा ठाणे) येथील हिंदुत्वनिष्ठ व्याख्याते आणि लेखक श्री. दुर्गेश परुळकर (आध्यात्मिक पातळी ६१ टक्के) सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात सपत्नीक आले होते. त्या वेळी झालेल्या भेटीत श्री. परुळकर मला म्हणाले, ‘‘मी आजपर्यंत ११ ग्रंथ लिहिले असून हे ग्रंथ राष्ट्र, धर्म आणि क्रांतीपुरुषांचा इतिहास या विषयांशी संबंधित आहेत. आम्ही पती-पत्नी यांनी चर्चा केली आहे. आमच्या मागे कोणी नाही. ‘या ग्रंथांच्या प्रकाशनाचा उत्तराधिकार अन्य कोणालाही न देता सनातनला द्यावा’, असे आम्हाला वाटते. तसेच यासाठी आम्हाला सनातनकडून कुठलीही अपेक्षा नाही.’’

त्यांच्या बोलण्यात सनातनविषयी भाव होता. सनातनने अध्यात्म, धर्म आदी विषयांवरील ग्रंथ प्रकाशित करण्यास प्राधान्य दिलेले असल्याने क्रांतीपुरुषांची चरित्रे आदी विषयांवर सनातनचे ग्रंथ नाहीत. श्री. परुळकर यांनी लिहिलेल्या आणि सनातनला समर्पित केलेल्या ग्रंथांमुळे ती उणीव भरून निघाली आहे. यासाठी श्री. दुर्गेश परुळकर यांच्याप्रती कितीही कृतज्ञता व्यक्त केली, तरी थोडीच आहे.’

**– सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, संस्थापक, सनातन संस्था. (२४.३.२०२३)** F (21A-IHS + DW-SOH-DuP)

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

# ग्रंथाची अनुक्रमणिका

## (काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


| | | |
|---|---|---|
| **प्रकरण १.** | **महाभारताचे माहात्म्य** | १७ |
| १ अ. | ऋग्वेदानंतर पूज्य असलेला 'महाभारत' ग्रंथ ! | १७ |
| १ आ. | महर्षि व्यासांनी 'महाभारत' ग्रंथाविषयी ब्रह्मदेवांना सांगितलेली माहिती | १९ |
| १ इ. | 'महाभारत' ग्रंथाचा लेखनिक होण्यासाठी श्री गणरायांनी घातलेली अट ! | २० |
| १ उ. | महाभारत ग्रंथाचे अद्वितीयत्व ! | २३ |
| १ ऊ. | महाभारताची शिकवण | २५ |
| १ ए. | राजधर्म, राज्यसंस्था आदींविषयी महाभारतातील मार्गदर्शन | ३८ |
| १ ऐ. | करपद्धतीविषयी महाभारतातील मार्गदर्शन | ५९ |
| १ ओ. | प्रजेच्या चरितार्थाचा विचार करणारी हिंदूंची महाभारतकालीन राज्यसंस्था ! | ६१ |
| १ औ. | महाभारत काळातील सम्राट पद्धत | ६२ |
| १ अं. | महाभारताचे माहात्म्य वृद्धींगत करणारी सूत्रे | ६२ |
| १ क. | महाभारताचे वाचन आणि अध्ययन करा ! | ६७ |
| **प्रकरण २.** | **पितामह भीष्म** | ६८ |
| २ अ. | भगवान श्रीकृष्णांच्या लेखी अत्यंत आदर्श आणि वंदनीय असलेले पितामह भीष्म ! | ६८ |
| २ आ. | भीष्मांची जन्मकथा आणि त्यांनी केलेला उत्तम राज्यकारभार | ७३ |
| २ इ. | काशीच्या राजाच्या कन्यांचे हरण करण्याच्या प्रकरणी भीष्मांना दोष देणे योग्य नसणे | ८१ |

२ उ. पित्याच्या सुखासाठी भीष्मांनी केलेल्या कठोर प्रतिज्ञा ! ९७

२ ऊ. वंशपरंपरा नष्ट होण्याच्या स्थितीतही आपली आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा न मोडणारे भीष्म ! १०४

२ ए. पितामह भीष्म यांनी कौरव आणि पांडव यांच्या ज्ञानार्जनाकडे लक्ष देणे १०८

२ ऐ. कौरवांची दुष्ट वृत्ती ओळखून भीष्मांनी कौरव-पांडवांमध्ये कुरुराज्याची समान वाटणी करण्यास सुचवणे १११

२ ओ. द्रौपदी वस्त्रहरणाच्या प्रसंगात भीष्म दोषी होते का ? ११६

२ औ. युद्धखोर दुर्योधनाला त्याच्या हिताच्या गोष्टी निर्भीडपणे सांगणारे पितामह भीष्म ! १२३

२ अं. महाभारतीय युद्धाच्या पहिल्या नऊ दिवसांतील पितामह भीष्मांचा पराक्रम ! १३०

२ क. पितामह भीष्म यांचे रणभूमीवरील धीरोदात्त पतन ! १३७

२ ख. शरपंजरी पडलेल्या पितामह भीष्मांची वीरवृत्ती आणि कर्तव्यपरायणता ! १४२

२ ग. भीष्मांचे दिव्य परलोकगमन ! १५२

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन** १५५



**ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील चित्र उपलब्ध करून देणारे श्री. राहूल रजोरा यांच्याप्रती कृतज्ञता !**

‘मुखपृष्ठावरील चित्र श्री. राहूल रजोरा (Mr. Rahul Rajora), ‘चित्रावली (www.chitravali.com)’ यांनी उपलब्ध करून दिले. या बहुमोल सहकार्यासाठी आम्ही त्यांच्याप्रती कृतज्ञ आहोत.’ – **प्रकाशक**

## ग्रंथमालिका : महाभारतातील अलौकिक चरित्रे

# सामाईक मनोगत

'महाभारत' हा ग्रंथ म्हणजे ज्याची खोली मोजता येणार नाही, असा महासागर ! त्याचे महत्त्व या ग्रंथात विशद केले आहे. महाभारतातील अनेक व्यक्तीरेखा आपल्याला आकर्षित करतात. त्यांपैकी एक आहे 'पितामह भीष्म' आणि दुसरी आहे 'भगवान श्रीकृष्ण' ! प्रस्तुत खंडात प्रामुख्याने पितामह भीष्म यांच्या चरित्राविषयी, तर दुसऱ्या खंडात प्रामुख्याने भगवान श्रीकृष्णाच्या चरित्राविषयी विवेचन केले आहे.

भगवान श्रीकृष्णांनी सामाजिक, राजकीय आणि पारमार्थिक क्षेत्रांत मुक्तपणे संचार केला. जीवनात अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या तिन्ही क्षेत्रांत यशस्वीपणे वावरता यावे; म्हणून त्यांनी अखिल मानवजातीला मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या मार्गदर्शनाला स्थळकाळाचे बंधन नाही. कोणत्याही समाजाला हे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त आहे; म्हणूनच भगवान श्रीकृष्णांचे जीवन अलौकिक आहे.

मानवी समाज सुसंघटित असला पाहिजे, तरच त्या समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. ज्या मानवी समूहाची संस्कृती, इतिहास, श्रद्धास्थाने, सुख-दुःख आणि जीवनाचे ध्येय समान आहे, तसेच जो मानवी समूह भावनिक, बौद्धिक आणि वैचारिक पातळ्यांवर एकत्र बांधला गेला आहे त्या समूहाला 'समाज' म्हणतात.

भगवान श्रीकृष्णांनी अशा प्रकारचा समाज अस्तित्वात आणण्यासाठी योगदान दिले आहे. गीतेसारखा तात्त्विक ग्रंथ त्यांच्या मुखातून प्रकट झाला आहे. साक्षात् भगवंताच्या मुखातून प्रकट झालेले हे गीताज्ञान आज अखिल मानव समाजाला उपलब्ध आहे. भगवान श्रीकृष्ण समाजात वावरतांना 'प्रथम काय करावे ?', याचे मार्गदर्शन करतांना गीतेत म्हणतात

'लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि ।' (गीता, अध्याय ३, श्लोक २०), म्हणजे 'लोकसंग्रहाकडे दृष्टी देऊनसुद्धा तू कर्म करणेच योग्य आहे.'

## भगवान श्रीकृष्णांनी निसर्गनियमांचे तंतोतंत पालन करण्याचा उपदेश केला असणे

सर्वसामान्य माणूस हा भोगात रमलेला असतो. अशा लोकांच्या 'भोगजीवना'चे 'भावजीवना'त रूपांतर करण्यासाठी जाणकारांनी झटावे. नंतर याच लोकांच्या भावजीवनाचे रूपांतर 'भद्रजीवना'त (कल्याणकारी किंवा मंगलमय जीवनात) करावे. अशा प्रकारे हळूहळू लोकांना भद्रजीवनाची दीक्षा द्यावी. यालाच गीतेने 'लोकसंग्रह' म्हटले आहे. 'लोकसंग्रह' याचा अर्थ 'संख्याबळ' असा घ्यायचा नाही. नुसत्या संख्याबळाला अर्थ नाही, तर संख्याबळाबरोबर 'गुणबळ'ही महत्त्वाचे आहे. गुणी माणसेच समाज उभा करू शकतात. समाजातील माणसे गुणहीन असतील, तर सुसंघटित समाज निर्माण होणार नाही, तसेच समाजात सुव्यवस्था आणि सौख्य यांचा अभाव असेल.

वेगळ्या शब्दांत सांगायचे, तर 'भोगजीवना'ऐवजी प्रथम 'भावजीवन' निर्माण करावे लागेल. समाजातल्या प्रत्येकाविषयी प्रत्येकाच्या मनात आपलेपणाची सद्भावना निर्माण करावी लागेल. परस्परांचे दुःख जाणून ते दूर करण्यासाठी परस्परांना साहाय्य करणारा भाव समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण करावा लागेल. असा बंधुभाव निर्माण झाला की, या भावाचे रूपांतर भद्रजीवनात करावे लागेल. सर्वांनाच लोककल्याणकारी गोष्टींचा ध्यास लावावा लागेल. ज्या गोष्टींमुळे अखिल मानवी समाजाचे कल्याण होणार आहे, ती गोष्ट समाजाने स्वीकारली पाहिजे, तसेच ज्या गोष्टीमुळे समाजाचे अधःपतन होणार आहे, ती गोष्ट समाजाने नाकारली पाहिजे. असा सद्सद्विवेक जागृत असलेला समाज निर्माण करण्याचे मोठे कार्य सुजाण नागरिकांना करायचे आहे. याविषयीचे मार्गदर्शन भगवान श्रीकृष्णाने गीतेत केले आहे.

संख्याबळ प्रचंड असणाऱ्या समाजात गुणहीन लोकांची संख्या जास्त असेल, तर 'तो समाज सुसंस्कृत आणि सुविद्य आहे', असे म्हणता येणार नाही. समाजातील प्रत्येकाने काटेकोरपणे समाजनियमांचे पालन केले, तरच समाज सौख्याने जगू शकतो. अनेक जण साधे वाहतुकीचे नियम पाळत नाहीत, त्यामुळे अपघातांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गनियमांना अनुसरून आपण जीवन जगत नाही; म्हणूनच विविध प्रदूषणांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. आपण निर्बंधांच्या (कायद्याच्या) चौकटीत राहून कृती करत नाही, त्यामुळे अपराधांची (गुन्ह्यांची) संख्या वाढली आहे.

भगवान श्रीकृष्णांनी निसर्गनियमांचे तंतोतंत पालन करण्याचा उपदेश केला आहे. एवढेच नव्हे; तर त्यांनी स्वतः निसर्गनियमांचे काटेकोरपणे पालन केले आहे. निर्सगनियमांचे पालन करणे म्हणजे न्याय आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. न्याय, नैतिकता आणि सत्य या तीन तत्त्वांवर समाज उभा असला पाहिजे. या तीनही तत्त्वांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजात अन्याय होतच असतो; म्हणूनच न्याय प्रस्थापित करावा लागतो. 'सर्वच सत्याने आणि नैतिकतेने वागू लागले, तर कोणावरही अन्याय होणार नाही', अशी शिकवण देणारा 'महाभारत' हा ग्रंथ आहे. प्रत्येक माणसाने स्वतःला शिस्त लावली; सत्य, न्याय आणि नैतिकतेची चाड बाळगली; तर कलह, भांडणे होणार नाहीत. असा आदर्श समाज निर्माण करण्यासाठी माणसाने झटावे. असे काम करतांना, जर दुष्ट लोकांशी गाठ पडली, तर त्यांना वठणीवर आणण्यासाठी शस्त्र धारण करणे, प्रसंगी कठोर शासन करणे, हे न्याय्य आहे. हीच नैतिकता आहे. कल्याणकारी मानवी जीवनामध्ये अव्यवस्था निर्माण होत असेल, तर तिला वेळीच पायबंद घालणे, हाच मानवाचा खरा धर्म आहे. तेच मानवाचे कर्तव्य आहे.

अशी उच्च, उदात्त तात्त्विक बैठक असलेला समाज निर्माण करण्यासाठीच भगवंताने श्रीकृष्णावतार धारण केला. भगवंताच्या अवतारामागचा हा हेतू आपण समजून घेतला पाहिजे. मानवी समाज हा

विकसित समाज असला पाहिजे, प्रगत समाज नाही. प्रगतीमुळे एकाचा लाभ होतो, तर दुसऱ्याची हानी होते. असा समाज श्रीकृष्णाला मान्य नाही. F (I4A + PR 1FM-Bhi + PR 14)

## प्रगतीपेक्षा विकास महत्त्वाचा !

सध्याच्या विज्ञानयुगात विकासाऐवजी प्रगतीला महत्त्व दिले जाते. विकास आणि प्रगती हे दोन्ही समान आहेत, अशी अनेकांची समजूत आहे. ‘प्रगती’ या शब्दाची फोड प्र + गती. ‘प्र’ म्हणजे दूर जाणे. ‘प्रगती’ याचा अर्थ ‘वेगाने दूर जाणे’, असा होतो. सध्या आपण प्रगतीमुळे निसर्गापासून पुष्कळ दूर जात आहोत. आपल्या प्रगतीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे.

‘विकास’ या शब्दात कोणाचीही हानी होत नाही, हा भाव दडला आहे. फुलाचे फळात रूपांतर होण्याची क्रिया निसर्गामध्ये घडते. तो खरा विकास आहे. या नैसर्गिक घटनेचे सूक्ष्म दृष्टीने निरीक्षण केल्यास आपल्या लक्षात येईल की, उमललेल्या फुलातील मध चाखण्यासाठी कीटक त्या फुलावर बसतात. कीटकांच्या पायाला अन्य फुलांतील परागकण चिकटलेले असतात. त्यामुळे परागीभवनाची क्रिया होते. या क्रियेमुळे फुलाचे फळात रूपांतर होते. त्या फळात भावी वृक्षाचे बीज सुरक्षित राखलेले असते.

कीटकांनी फुलातील मध प्राशन केला, तरी फुलाची कोणतीही हानी होत नाही. कीटकाला मध मिळतो आणि फुलाचे फळात रूपांतर होते; म्हणून या विकासात दोघांचा लाभ आहे. समाजाचा विकास असाच सर्वांचा लाभ होऊन झाला पाहिजे. म्हणूनच संतांनीसुद्धा ‘एक एका साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ।।’ (तुकाराम गाथा, अभंग ५८६, ओवी १), म्हणजे ‘या रे या रे अवघे जन, तुम्ही आणि आम्ही (सर्वजण) मिळून एकमेकांच्या साहाय्याने चांगली वाट धरूया’, असे म्हणत समाज संघटित करण्याचा प्रयत्न केला आहे. F (PR 1FM-Bhi)

## भगवान श्रीकृष्णांची लीला सांगणारा ग्रंथ ‘श्रीमद्‌भागवत’ !

भगवान श्रीकृष्ण हा श्री विष्णूचा आठवा अवतार आहे. महर्षि व्यासांनी महाभारतासारखा ऐतिहासिक ग्रंथ लिहिला, तसेच ‘ब्रह्मसूत्रा’वरचा ज्ञानाने ओतप्रोत भरलेला ग्रंथ लिहिला; पण जेव्हा ‘श्रीमद्‌भागवत’ हा भगवान श्रीकृष्णांची लीला सांगणारा ग्रंथ त्यांनी लिहिला, तेव्हा त्यांचे अंतःकरण शांत, समाधानी आणि प्रसन्न झाले. या ग्रंथाचे सार सांगणारा एक श्लोक आहे, तो असा –

आदौ देवकिदेविगर्भजननं गोपीगृहे वर्धनं
मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम् ।
कंसच्छेदनकौरवादिहननं कुन्तीसुतां पालनं
एतद्‌भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम् ।।

अर्थ : आरंभी ज्याचा जन्म देवकीच्या पोटी झाला, नंतर जो गोपींच्या घरी लहानाचा मोठा झाला, ज्याने कपटी असलेल्या पूतनेचा नाश केला, ज्याने आपल्या करांगुलीवर गोवर्धन पर्वत तोलून धरला, ज्याने कंस आणि कौरवांचा नाश करून कुंतीपुत्रांचे रक्षण केले, त्या श्रीकृष्णाच्या लीलामृताचे वर्णन भागवत पुराणात करण्यात आले आहे.

‘श्रीमद्‌भागवत’ हा ग्रंथ श्रीकृष्णाचे श्रेष्ठत्व सांगणारा ग्रंथ आहे. भगवंताला जाणून त्याचे वर्णन करण्याची क्षमता वेदांमध्येही नाही. वेद (पुरुषसूक्त) म्हणतात ‘स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ।’ (ऋग्वेद, मण्डल १०, सूक्त ९०, ऋचा १) म्हणजे ‘तो परमात्मा सर्व भूमी आणि विश्व व्यापून अजून दहा बोटे उरला आहे.’ ही दहा बोटे म्हणजे आपल्या हाताची दहा बोटे, असा अर्थ नाही. या ठिकाणी दहा बोटे या शब्दप्रयोगाचा अर्थ हे आपल्याला डोळ्यांनी दिसणारे जे विश्व आहे, त्याच्याही पलिकडे सूक्ष्म विश्व अस्तित्वात असून त्या विश्वात भुवर्, स्वर्ग, महर् असे अनेक लोक दशदिशांमध्ये विखुरलेले आहेत. तिथेसुद्धा हा परमात्मा आहे. F (PR 1FM-Bhi + PR 14)

## भगवान श्रीकृष्णाचे परमभक्त असलेले पितामह भीष्म !

पितामह भीष्म कर्तृत्ववान होते. ईश्वराचे परमभक्त होते. ज्ञानी होते. भगवान श्रीकृष्णसुद्धा पितामह भीष्मांसमोर नतमस्तक होत असत. 'पितामह भीष्मांच्या दृष्टीतून आपण उतरू नये', अशी काळजी भगवान श्रीकृष्ण घेत असत. अशा भीष्मांनी अन्यायाचा पक्ष घेतला होता; म्हणून त्यांचा वध होणे धर्मरक्षणासाठी नितांत आवश्यक होते. श्रीकृष्णाने अर्जुनाच्या हातून त्यांचा वध करवला. असे असले तरी, भगवंताने त्यांना पांडवांना उपदेश करण्याचीही विनंती केली.

पितामह भीष्मांनाही 'आपण अधर्माचा पक्ष घेतला आहे', याची खंत वाटत होती. ते प्रतिज्ञाबद्ध असल्याने त्यांना इच्छा असूनही न्यायाचा (धर्माचा) पक्ष घेता आला नाही. आपल्या प्रतिज्ञेसाठी ते मृत्यूला कवटाळण्यास सिद्ध झाले. अशा पितामह भीष्मांनी आपल्या महापराक्रमाने भगवंताला त्याची प्रतिज्ञा भंग करण्यास भाग पाडले. भगवान श्रीकृष्णांनी 'कौरव-पांडव यांच्या युद्धात हाती शस्त्र धारण करणार नाही', अशी प्रतिज्ञा क्षत्रियांच्या सभेत केली होती. तेव्हा पितामह भीष्मांनी त्याच सभेत प्रतिज्ञा केली, 'मी भगवान श्रीकृष्णांना हातात शस्त्र घेण्यास बाध्य करेन.' श्रीकृष्णाला जाणणाऱ्या मोजक्याच भक्तांमध्ये भीष्मांचा समावेश होतो.

## संत नामदेव महाराजरचित अभंग 'भीष्मप्रतिज्ञा' !

'भीष्मप्रतिज्ञा' या नावाचा एक अभंग संत नामदेव महाराजांनी रचला आहे. या अभंगात ते लिहितात की, श्रीकृष्णाने युद्धात अनेक वीरांना मारण्यासाठी 'माव' म्हणजे लीला केली. एवढेच नाही, तर त्याने स्वतःची वाणी जगात खोटी ठरवली. 'अर्जुन हा अजेय योद्धा असला, तरी पितामह भीष्मांच्या तुलनेत तो पोरवयाचा आणि कोवळा होता', हे सांगतांना नामदेव महाराज म्हणतात, 'पार्थाचें शरीर पुष्प पळसाचा ।' (भीष्मप्रतिज्ञा, अभंग १, ओवी ५), म्हणजे 'अर्जुन हा पितामह भीष्मांसमोर

पळसाच्या फुलासारखा नाजूक आहे.' अशा अर्जुनाच्या रक्षणार्थ श्रीकृष्णाने केलेल्या कृतीचे वर्णन करतांना संत नामदेव महाराज म्हणतात, 'देखोनि निदान प्रतोद ठेवून । प्रथित हो रथचक्र होतें ।।' (भीष्मप्रतिज्ञा, अभंग १, ओवी ८), म्हणजे 'भीष्मांनी अर्जुनावर केलेले शरसंधान पाहून श्रीकृष्णाने हातातील चाबूक खाली ठेवला आणि रथाचे चाक हातात घेतले.'

भगवंताने हातात रथचक्र घेतलेले पहाताच 'भीष्म काय म्हणाले ?', हे सांगतांना नामदेव महाराज म्हणतात, 'भीष्म म्हणे देवा माझी सत्य केली । प्रतिज्ञा हरली आपुली हो ।।' (भीष्मप्रतिज्ञा, अभंग १, ओवी ११), म्हणजे 'भगवंता, माझी प्रतिज्ञा खरी करण्यासाठी तुम्ही तुमच्या प्रतिज्ञेचा भंग केलात.' पितामह भीष्म भगवंताला पुढे म्हणतात –

जरी तुझे चित्तीं असे तें मारणें । कवण तो रक्षण करील माझें ।।
येऊनि लवकरी बैसे रथावरी । खड्ग तुझ्या करीं देत आहें ।।
– भीष्मप्रतिज्ञा, अभंग १, ओवी १२ आणि १३

अर्थ : भगवंता, तू जर मला मारायचे ठरवले असशील, तर माझे रक्षण कोण बरे करू शकेल ? म्हणून हे खड्ग मी तुझ्या हातात देतो, मला मारून रथावर जाऊन बस.

यानंतर रणांगणात सर्वांनी भीष्मांचा जयजयकार केला. भक्तावरील भगवंताच्या प्रेमाचे वर्णन करतांना संत नामदेव महाराज पुढे लिहितात 'नामा म्हणे ऐसी भक्ताची हो चाड । आपण लबाड झालें देव ।।' (भीष्मप्रतिज्ञा, अभंग १, ओवी १६), म्हणजे 'आपल्या भक्ताची प्रतिज्ञा खरी करण्यासाठी, त्याची लाज राखण्यासाठी भगवंताने लबाडी केली !'

## पाठभेद

'श्रीकृष्ण पितामह भीष्मांवर रणांगणात धावून गेले, त्या वेळी श्रीकृष्णांच्या हातात काय होते ?', याविषयी पाठभेद आढळतात.

'पहिल्या वेळी श्रीकृष्णांच्या हातात सुदर्शनचक्र होते, तर दुसऱ्या वेळी त्यांच्या हातात चाबूक होता', अशी माहिती आम्ही प्रस्तुत ग्रंथात दिली आहे. वर उल्लेखिलेल्या संत नामदेव महाराज यांच्या अभंगात 'श्रीकृष्णांच्या हातात रथचक्र होते', असे म्हटले आहे. आमच्या दृष्टीने 'या प्रसंगात श्रीकृष्णांच्या हातात काय होते, यापेक्षा या प्रसंगातून काय शिकायला हवे ?', याला महत्त्व आहे. या प्रसंगात 'धर्माच्या रक्षणासाठी आवश्यकता पडली, तर स्वतःची वैयक्तिक प्रतिज्ञाही मोडता आली पाहिजे', हे श्रीकृष्णांकडून शिकायला हवे, तसेच 'श्रीकृष्णांप्रतीचा उत्कट भाव कसा हवा ?', हे पितामह भीष्म यांच्याकडून शिकायला हवे !

## कृतज्ञता !

पितामह भीष्मांवरील प्रस्तुत ग्रंथ आणि भगवान श्रीकृष्णांवरील पुढचा ग्रंथ, या दोन्ही ग्रंथांतील मुद्रणदोष दूर करण्यात आणि ग्रंथांची मांडणी निकोप होण्यात ग्रंथांशी संबंधित सेवा करणाऱ्या सनातनच्या साधकांचे मोठे योगदान आहे. साधकांनी हे ग्रंथ अत्यंत बारकाईने वाचून अनेक शंका काढल्या. ग्रंथलेखन करीत असतांना अशा प्रकारच्या शंका वाचकांच्या मनात निर्माण होऊ शकतील, असा मी कधीच विचार केला नव्हता. माझ्यातील ही त्रुटी मला कु. करुणा मुळे, कु. तृप्ती कुलकर्णी, श्री. गिरिधर वझे, श्री. संजय मुळ्ये अन् श्री. जीतेंद्र आंब्रे यांच्यामुळे दूर करता आली.

या ग्रंथात ठिकठिकाणी संस्कृत वचने उद्धृत करण्यात आली आहेत. 'ती वचने कोणत्या ग्रंथातील आहेत', ते पडताळून त्याची नोंद करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सौ. दीप्ती गौरांग आगाशे आणि सौ. राघवी मयूरेश कोनेकर, या सनातनच्या साधिकांनी केले.

या ग्रंथांचे स्वागत आपण सारे जण कराल, याविषयी मला निश्चिती आहे. या ग्रंथांच्या निर्मितीसाठी मी 'सनातन भारतीय संस्कृती संस्था' आणि संबंधित सर्व साधक-साधिका यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

## प्रार्थना !

श्रीकृष्णाची स्तुती गातांना भक्त म्हणतात -



कृष्णो रक्षतु नो जगत्रयगुरुः कृष्णं नमस्याम्यहं
कृष्णेन अमर-शत्रवो विनिहताः कृष्णाय तस्मै नमः।

कृष्णादेव समुत्थितं जगदिदं कृष्णस्य दासोऽस्म्यहं
कृष्णे तिष्ठति सर्वमेतदखिलं हे कृष्ण रक्षस्व माम् ।।

अर्थ : त्रैलोक्याचा गुरु असणाऱ्या श्रीकृष्णाने आमचे रक्षण करावे. माझा कृष्णाला नमस्कार आहे. ज्या कृष्णाने देवांच्या शत्रूंचा संहार केला, त्या कृष्णाला माझा नमस्कार असो. श्रीकृष्णापासूनच हे जग उत्पन्न झाले, त्या श्रीकृष्णाचा मी दास आहे. सर्व जग कृष्णाच्या ठिकाणी स्थित आहे. हे श्रीकृष्णा, माझे रक्षण कर.

मीही श्रीकृष्णाला हीच प्रार्थना करून माझे मनोगत पूर्ण करतो'.

F (PR 1FM-Bhi)

**श्री. दुर्गेश जयवंत परुळकर**
भ्रमणभाष क्र. : ९८३३१ ०६८१२

## प्रकाशकाची भूमिका !

'ग्रंथाचे लेखक श्री. दुर्गेश परुळकर हे एक तत्त्वचिंतक, साहित्यिक, सावरकरवादी, राष्ट्रप्रेमी आणि धर्मप्रेमी आहेत. 'अशा विभूतीमत्वाचा ग्रंथ प्रकाशित करणे', हे धर्मकार्यच असून, ते करतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. श्री. परुळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून शब्दबद्ध झालेल्या लिखाणाचा ओज तसाच टिकून रहाण्यासाठी आम्ही लिखाणाची भाषा, व्याकरण इत्यादी फारसे पालटलेले नाही. काही ठिकाणी लेखन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.' – **प्रकाशक**